# मुंबई विद्यापीठ

संदर्भ :- क्र. संलग्नता/आय सी डी/२०१८-१९/९७-

## परिपत्रक:

**"शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ करीताचा मुंबई विद्यापीठ बृहत आराखडा तयार करण्यासाठी विविध सामाजिक घटकांकडून सूचना प्राप्त करणेबाबत."**

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व सन्माननिय विद्यापीठ प्राधिकरणांचे सदस्य / लोकप्रतिनिधी, शिक्षण तज्ञ, संस्थाचालक, उद्योजक, पालक, विद्यार्थी व इतर सामाजिक घटक यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठ कार्यक्षेत्र अंतर्गत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ वर्षाच्या बृहत आराखड्यामध्ये विविध अभ्यासक्रम व ठिकाण समाविष्ट करावयाचे आहेत. सबब, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी नविन महाविद्यालये व अभ्यासक्रमांबाबत प्रस्तावित ठिकाणांच्या शैक्षणिक गरजा, भौगोलिक परिसर, लोकसंख्या, सामाजिक परिस्थिती इत्यादी तसेच डॉ. नरेंद्र जाधव समितीने केलेल्या सुचनांच्या अनुषंगाने व बदलते तंत्रज्ञान, काळाची गरज तसेच आदिवासी, डोंगराळ / दुर्गम भागातील गरजा व अडचणी यांचा विचार करून आपण व्यवसाय तथा रोजगाराभिमूख अभ्यासक्रमांना प्राधान्य देत आपल्या सविस्तर सुचना मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे https://muonline.org.in या संकेतस्थळाचा वापर करून ऑनलाईन उपलब्ध केलेल्या प्रश्नावली मार्फत आपल्या अमुल्य सूचना सादर कराव्यात तसेच, आपल्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून याच प्रश्नावलींचे नमुना अर्ज Downloads या लिंकमध्ये उपलब्ध आहेत. त्यावर आपण हस्थलिखित सूचना-प्रश्नावलीची Hard Copy या कार्यालयास दिनांक २३-०६-२०१८ रोजी सायं. ५ पर्यंत कक्ष क्र. २०७, संलग्नता/मान्यता विभाग, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे सादर करावे व याच संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या डॉ. नरेंद्र जाधव समितीने केलेल्या सुचनांचे अवलोकन करावे, ही विनंती.

मुंबई. ४०००३२
१५ जून, २०१८

(दीपक वसावे)
उपकुलसचिव
संलग्नता/मान्यता विभाग